



# उन्हाळ्यातील कोंबड्यांचे व्यवस्थापन



कुक्कुटपालकांचे उन्हाळ्यात पक्ष्यांच्या मरतुकीमुळे फार मोठे नुकसान होते. कोंबडीचे तापमान साधारणतः १०४ ते १०७ अंश फॅरनहाइट इतके असते. यात होणारा बदल हा सभोवतालच्या वातावरणावर आणि काही अन्य घटकांवर अवलंबून असतो. सभोवतालचे तापमान कोबडीच्या अंतर्गत तापमानापेक्षा जर १० ते १५ अंश फॅ. ने कमी असेल तेव्हा पक्ष्याला आपले तापमान नियंत्रित करणे सहज शक्य होते.

कोंबडी थंड वातावरणात आपले तापमान ७३ अंश फॅ. इतके कमी होईपर्यंत तग धरू शकते; पण उष्णतेच्या बाबतीत फक्त १० अंश फॅ.पर्यंतच (११३ ते ११७) वाढ सहन करते. शीघ्रतेने ही उष्णता कमी झाली नाही, तर पक्ष्यांच्या मरतुकीत होते. शरीरातून उष्म्याचे उत्सर्जन मुख्यत्वे कातडीवर येणाऱ्या घामामुळे आणि श्वसन क्रियेद्वारे केले जाते. कोंबडीमध्ये घामाच्या ग्रंथी नसल्याने उष्णतेचे उत्सर्जन हे मुख्यत्वे श्वसनातून केले जाते. आत येणारी थंड हवा, फुफ्फुसाला जोडून असणाऱ्या विशिष्ट हवेच्या पिशव्या शरीरात आतपर्यंत घेऊन जातात आणि आतील उष्मा बाहेर काढतात.

कोंबड्यांना जर उष्णतेचा त्रास जाणवत असेल, तर त्या शांतपणे उभ्या राहतात. त्यांच्यामध्ये मंदपणा व सुस्तपणा दिसून येतो. काही कोंबड्या या पाणी पिण्याच्या भांड्याजवळ मान वाकवून उभ्या असतात; तसेच काही कोंबड्या या भिंतीचा आडोसा घेऊन शांतपणे उभ्या असतात. उन्हाळ्यात जर कोंबड्यांना उष्माघाताचा त्रास जाणवत असेल, तर त्या जास्त पाणी पितात व खाद्य कमी प्रमाणात खातात. कोंबड्या शरीरातील वाढलेल्या उष्णतेला कमी करण्यासाठी व थंडपणा आणण्यासाठी त्यांचे पंख शरीरापासून दूर पसरवितात.

उष्णतेला कमी करण्यासाठी कोंबड्या तोंडाची सतत उघडझाप करून धापा टाकताना शेडमध्ये दिसून येतात. काही कोंबड्या श्वास घेण्यास धडपडू लागतात व त्यांना दम लागतो. काही कोंबड्यांचे उष्माघातामुळे पाय लटपटतात आणि ठराविक काळासाठी त्या चक्कर येऊन खाली पडतात, त्यांची त्वचा रखरखीत होते व रंगामध्ये फरक दिसून येतो.

कोणत्याही प्रकारचे कारण नसताना, कोंबड्यांच्या अंडी देण्याच्या व अंडी उबविण्याच्या क्षमतेतसुद्धा कमीपणा आलेला दिसून येतो. कोंबड्यांच्या अंड्यांचा आकार हा लहान होतो व त्यांच्या अंड्यांच्या कवचाची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची झालेली दिसून येते. मांसल कोंबड्यांमध्ये उष्माघातामुळे वाढीचा दर कमी होतो व त्या अधिक प्रमाणात उष्माघातामुळे मृत्युमुखी पडतात.

प्रकाशन

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

## उन्हाळ्यातील व्यवस्थापन

कोंबड्यांना उष्माघातापासून वाचविण्यासाठी त्यांना चांगल्याप्रकारे आच्छादित भिंत व छताच्या शेडमध्ये ठेवावे. त्याचप्रमाणे शेडमध्ये हवा खेळती राहील अशा ठिकाणी व दिशेस (पूर्व-पश्चिम) शेडची बांधणी करावी. छताच्या पुढच्या बाजूला २४ इंच एवढ्या लांबीचे आच्छादन बसवावे. उन्हाळा सुरू होण्यापूर्वी छताची सफाई करावी व त्यास पांढऱ्या रंगाने किंवा झिंक धातूने रंगविणे फायदेशीर ठरते. तसेच छतावर वाळलेल्या गवताच्या पेंढ्या, भाताचा कोंडा टाकावा व त्यास ओले ठेवावे. दिवसातून तीन-चार वेळेस छतावर पाण्याची फवारणी करावी. असे केले असता शेडमधील तापमान कमी होऊन कोंबड्यांना थंडावा मिळतो. तसेच शेडच्या एका बाजूला पोत्याचे पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे, जेणेकरून शेडमध्ये थंडपणा राहील व कॉवड्यांना उष्माघातापासून वाचविता येईल. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शेडमध्ये ताजी हवा खेळती ठेवणे फार महत्त्वाचे आहे. हवा खेळती न राहिल्यामुळे शिळी व दूषित हवा पक्ष्यांच्या शेडमध्ये तयार होते व त्या हवेत अमोनिया, ओलसर कार्बन-डाय ऑक्साईड आणि धुळीचा शिरकाव होतो व कोंबड्यांवर ताण येऊ शकतो. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कोंबड्यांच्या खाद्यांमध्ये अचानकपणे बदल करू नये. उन्हाळ्यामध्ये कोंबड्यांना खात्रीशीर, स्वच्छ, थंड व मुबलक पाण्याची व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. याकरिता शेडमधील पिण्याच्या पाण्याची भांडी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ३५ ते ५० टक्क्यांनी वाढवावी. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये लसीकरण सकाळच्या वेळी करावे, तसेच लसीची साठवण ही थंड ठिकाणी करावी. कारण या काळात लस नष्ट होण्याचा धोका संभवतो. त्याचप्रमाणे उष्माघातविषयक लक्षणे व प्राथमिक उपचाराविषयी शेडवरील कामगारांना तज्ज्ञ पशुशास्त्रज्ञांकडून माहिती देणे आवश्यक आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शेडमध्ये ताजी हवा खेळती ठेवणे फार महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यात हवेचा प्रवाह नियंत्रित ठेवावा. पडदे असणाऱ्या शेडमध्ये १/२ हॉर्सपावर असणारा ३६ इंची पंखा ११०० घनफूट इतकी हवा ४०-५० फूट जागेतून बाहेर काढतो. पंख्याची दिशा ही हवेच्या प्रवाहाच्या दिशेने असावी मध्यभागी पंखे लावायचे असल्यास ही हवेच्या प्रवाहाच्या दिशेने असावी मध्यभागी पंखे लावायचे असल्यास परस्परांतील अंतर सहा फुटांपेक्षा अधिक असावे छतावर पाण्याचे फवारे आणि आतुन पांढऱ्या रंगाची सफेदी उष्म्यास अवरोध निर्माण करतात. फॅणर्सचा वापर पंखे बंद असताना करु नये, तसेच त्यांना रात्री बंद ठेवावे. पंखे आणि फॉगर्स नियमित सुरु ठेवताना वीजपुरवठा खंडीत झाल्यास जनरेटरची सोय असावी. उष्माघाताच्या त्रासापासून कोंबड्यांना वाचविण्यासाठी सकाळी लवकर व सायंकाळी उशिरा खाद्य खाण्यास द्यावे; तसेच उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कोंबड्यांच्या खाद्यांमध्ये अचानकपणे बदल करू नये.

कोंबड्यांच्या शेडच्या सभोवतालची जमीन ही गवताने आच्छादित केली असता, शेडमध्ये सूर्यप्रकाश कमी प्रमाणात उत्सर्जित होतो व प्रत्यक्षपणे उष्माघाताच्या प्रकोपापासून कोंबड्यांचा बचाव करता येतो. तसेच, शेडच्या सभोवताली झाडा-झुडपांचे कुंपण असेल, तर उन्हाळ्याच्या सुरवातीला त्यांची छाटणी करून घ्यावी. असे केल्याने ताज्या हवेची हालचाल शेडमध्ये होत राहील व उष्णतेचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कोंबड्यांच्या जास्त हालचालींमुळे त्यांच्या शारीरिक उष्णतेत वाढ होऊन, त्यांच्यावर उष्णतेचा ताण येऊ शकतो. हे टाळण्यासाठी कुक्कुटपालकाने व तेथील कामगाराने जास्त वेळा शेडमध्ये जाणे टाळावे. शेडमध्ये पक्ष्यांची अधिक गर्दी असेल, तर पक्ष्यांची घनता कमी करावी.


www.mafsu.in

✻ मार्गदर्शक ✻

www.knpcvs.in

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✻ संकलन ✻



**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.